**G20 शिखर परिषद 2025 च्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आणि इटलीच्या पंतप्रधानांची भेट (23 नोव्हेंबर 2025)**

23 नोव्हेंबर 2025

भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आज जोहान्सबर्ग, दक्षिण आफ्रिकेमध्ये G20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर इटलीच्या पंतप्रधान श्रीमती जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. यापूर्वी यावर्षी जून मध्ये कॅनडातील कनानास्किस मध्ये G7 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांनी थोडक्यात संवाद साधला होता.

2. पंतप्रधान मेलोनी यांनी दिल्लीत घडलेल्या दहशतवादी घटनेसंदर्भात भारतासोबत एकजूट व्यक्त केली आणि दहशतवादाशी लढण्यासाठी एकत्र काम करण्याच्या इटलीच्या दृढ वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या संदर्भात, दोन्ही नेत्यांनी 'दहशतवादाच्या फायनान्सिंगचा सामना करण्यासाठी भारत-इटली संयुक्त उपक्रम' स्वीकारला. फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (FATF) आणि ग्लोबल काउंटर टेररिझम फोरम (GCTF) सह जागतिक आणि बहुपक्षीय मंचांवर दहशतवादाचा सामना करण्यासाठी आणि सहकार्य करण्यासाठी द्विपक्षीय सहकार्य मजबूत करणे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

3. नेत्यांनी व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, अंतराळ, विज्ञान आणि तंत्रज्ञान, शिक्षण आणि जनतेमधील परस्पर संबंध यासारख्या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारीतील विकासांचा आढावा घेतला आणि सकारात्मक मूल्यांकन केले. उभय नेत्यांनी संयुक्त धोरणात्मक कृती योजना 2025-29 च्या प्रगतीवर समाधान व्यक्त केले.

4. नेत्यांनी यावर्षी नवी दिल्ली आणि ब्रेशिया येथे आयोजित दोन व्यवसाय मंचांचे स्वागत केले, ज्यात दोन्ही देशांच्या उद्योग क्षेत्रांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. दोन्ही अर्थव्यवस्थांची स्पर्धात्मकता वाढविणे आणि लवचिक पुरवठा साखळी निर्माण करण्याच्या उद्देशाने व्यवसाय, तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि गुंतवणूक भागीदारी वाढविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची नेत्यांनी नोंद केली.

5. इटालियन स्पेस शिष्टमंडळाच्या अलीकडील भारत भेटीचे या नेत्यांनी कौतुक केले, ज्यामुळे या क्षेत्रात सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील दोन्ही स्तरांवर सहकार्य वाढेल.

6. पंतप्रधान मेलोनी यांनी भारत-EU मुक्त व्यापार करार लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आणि 2026 मध्ये भारताद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या AI इम्पॅक्ट शिखर परिषदेच्या यशस्वीतेसाठी इटलीचा ’ सर्वोपतरी पाठिंबा व्यक्त केला.

7. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील नियमित उच्च-स्तरीय देवाणघेवाणीच्या परंपरेला पुन्हा बळकटी मिळाली. दोन्ही नेत्यांनी लोकशाही, कायद्याचं राज्य आणि शाश्वत विकासाच्या सामायिक मूल्यांना टिकवून ठेवण्यासाठी बहुपक्षीय आणि जागतिक व्यासपीठांवर एकत्रितपणे काम करण्यासाठी उत्सुकता दाखवली.

जोहान्सबर्ग

23 नोव्हेंबर 2025